आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१ जून २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- विधान परिषदेच्या १७ जागांसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली, जवळपास सर्वच पक्षात बंडखोरी

- २०४७ पर्यंत एसटीच्या सर्व बस इलेक्ट्रीक करण्याचा राज्य सरकारचा मानस

- व्यावसायिक वापराच्या आणि ५ किलो वजनाच्या एलपीजी सिलेंडरच्या किंमतीत वाढ

- आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेचा निकाल जाहीर

**आणि**

- ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या पार्थिवावर मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपली. जवळपास सर्वच पक्षांमध्ये बंडखोरी झाल्यानं गुरुवारी अर्ज माघारीची मुदत संपल्यावर निवडणुकीचं चित्र स्पष्ट होणार आहे.

याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**------- व्हीसी -------**

*(विधानपरिषदेच्या वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, अमरावती, सांगली - सातारा, सोलापुर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर-जालना, नांदेड, बीड-लातूर-धाराशिव, जळगाव, ठाणे, नाशिक, परभणी, यवतमाळ, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे आणि नागपूर या मतदारसंघासाठी ही निवडणूक होते आहे. महायुतीकडून भाजपा ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेस ८, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तीन जागा लढवणार आहे, असं या पक्षांनी जाहीर केलं होतं.*

*पुणे मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांनी अर्ज दाखल केला. त्याशिवाय सुनील टिंगरे यांनीही अर्ज भरला आहे. दोघांकडे एबी फॉर्म असल्यानं अधिकृत उमेदवार कोण यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.*

*ठाणे मतदारसंघासाठी शिवसेनेचे रवींद्र फाटक तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अभिजीत पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. नाशिक विधानपरिषद मतदारसंघातून शिवसेनेच्या नरेंद्र दराडे यांनी आज दुपारी अर्ज दाखल केला. तसंच भाजपा नेते गणेश गिते यांचे बंधू गोकुळ गिते यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. विशेष म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उमेदवार न देण्याचा निर्णय आज पत्रकार परिषदेत जाहीर केला. मात्र कोणत्या उमेदवाराला पाठिंबा देणार हे ठाकरेंच्या पक्षानं अद्याप जाहीर केलं नाही. नाशिकमधे ९ उमेदवारांनी १४ अर्ज दाखल केल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.*

*भंडारा - गोंदिया मतदारसंघासाठी महायुतीकडून भाजपाचे अविनाश ब्राह्मणकर यांनी तर काँग्रेसकडून प्रफुल अग्रवाल आणि दिलीप बनसोड यांनी अर्ज दाखल केले. वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर मतदारसंघासाठी काँग्रेसच्या शैलेश अग्रवाल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. नांदेड मतदारसंघासाठी ८ उमेदवारांनी १७ अर्ज दाखल केले. भाजपाकडून अशोक चव्हाण यांचे निकटवर्तीय अमर राजुरकर यांनी तर काँग्रेसकडून रामदास पाटील सुमठाणकर यांनी अर्ज दाखल केले.*

*बीड-लातूर-धाराशिव मतदारसंघासाठी काँग्रेसमधून भाजपात आलेले बसवराज पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेसकडून धाराशिव जिल्हा परिषदेचे सदस्य महेश देशमुख यांना संधी देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर - जालना मतदारसंघासाठी महायुतीकडून सुहास शिरसाट यांनी तर महाविकास आघाडी कडून देवयानी पाटील डोणगावकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सिल्लोड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष समीर अब्दुल सत्तार यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.*

*यवतमाळमधे काँग्रेसचे साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघात महायुतीत बंडखोरी झाली असून तिन्ही पक्षांनी आपापले उमेदवार उभे केले आहेत. शिवसेनेकडून दुष्यंत चतुर्वेदी,भाजपाकडून नितीन भुतडा तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून साजिद बेग यांना उमेदवारी देण्यात आली आहे.*

*नागपूर मतदारसंघासाठी काँग्रेसच्या अतुल लोंढे आणि दिनेश ढोले यांनी अर्ज दाखल केले. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे, तसंच शेकापचे अरविंद म्हात्रे यांच्यासह मानसी म्हात्रे, अनिल चोपडा यांनीही अर्ज दाखल केले. जुईली दळवी यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून या मतदारसंघासाठी सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने यानी अर्ज दाखल केला. सोलापुरातून भाजपाने माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी दिली आहे.*

*दरम्यान, महायुतीचे १७ पैकी १७ उमेदवार विजयी होतील असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. महायुतीतल्या बंडखोरीविषयी विचारलं असता महायुतीचे घटक पक्ष एकत्र येऊन चर्चा करतील आणि बंडखोर उमेदवारांचे अर्ज मागे घेतले जातील असं ते म्हणाले. महायुतीमधे कोणतेही मतभेद नसून सर्व जागा महायुती जिंकेल, असा विश्वास महसूलमंत्री आणि भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनीही व्यक्त केला आहे.*

*या निवडणुकीसाठी २२ जून रोजी मतदान होणार असून त्याचदिवशी मतमोजणी होईल.)*

<><><><><>

‘विकसित महाराष्ट्र अंतर्गत’ एसटी महामंडळामध्ये 2029 पर्यंत 50 टक्के, 2035 पर्यंत 80 टक्के; तर 2047 पर्यंत एसटीचा 100 टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरीत करायचा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी यासंदर्भात बैठक झाली. या बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. या अनुषंगानं बसेससाठी चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

व्यावसायिक वापरासाठीच्या सिलेंडरच्या दरांमध्ये वाढ झाली आहे. घरगुती वापरासाठीच्या गॅसच्या दरात बदल झालेला नाही. १९ किलो वजनाचा सिलेंडर मुंबईत साडे ४३ रूपयांनी महागला असून त्याची किंमत ३ हजार ६७ रूपये ५० पैसे झाली आहे. पाच किलोग्रम वजनाच्या छोट्या गॅस सिलेंडरच्या दरात ११ रूपये वाढ झाली आहे.

दरम्यान, केंद्र शासनाने आजपासून पेट्रोल, डिझेल आणि एटीएफ म्हणजे विमान इंधनावरचा निर्यात कर कमी केला आहे. पेट्रोलच्या निर्यातीवरील विंडफॉल गेनवरचा कर

निम्म्यावर आणून १ रूपया ५० पैसे प्रतिलीटर, तर डिझेल १३ रूपये ५० पैसे प्रतिलीटर आणि एटीएफवरचा कर ९ रूपये ५० पैसे प्रतिलीटर केला आहे.

**<><><><><>**

आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यंदा ५६ हजार ८८० विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरले असून त्यात १० हजार १०७ विद्यार्थिनी आहेत.

आयआयटी दिल्ली विभागातला शुभम कुमार ३६० पैकी ३३० गुण मिळवून देशात सर्वप्रथम आला आहे. विद्यार्थिनींमधे दिल्ली विभागातली आरोशी देशपांडे पहिली आली आहे. तिला २८० गुण मिळाले असून सर्वसाधारण यादीत ती ७७व्या क्रमांकावर आहे. विद्यार्थ्यांना जेईईएडीव्ही.एसी. इन या संकेतस्थळावर निकाल पाहता येतील.

**<><><><><>**

भावसंगीतात आपल्या मखमली आणि मधाळ स्वरांनी अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या पार्थिवावर आज मुंबईत शासकीय इतमामात अंतिम संस्कार झाले. काल रात्री मुंबईतल्या राहत्या घरी निधन झालं. त्या ८९ वर्षांच्या होत्या.

संगीतातल्या त्यांच्या अमूल्य योगदानासाठी त्यांना, 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं, तर मध्य प्रदेश सरकारनं त्यांना 'लता मंगेशकर' पुरस्कारांनं सन्मानित केलं होतं.

सुमन कल्याणपूर यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री यांच्यासह विविध मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

लाडकी बहीण योजनेतून विविध कारणांमुळं ८० लाखांहून अधिक लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आली आहे. अडीच लाखापेक्षा अधिक उत्पन्न, ई-केवायसीची अनुपलब्धता, कुटुंबातल्या सदस्याच्या नावे वाहन, इतर सरकारी योजनांचा लाभ यासारख्या कारणामुळं ही नावं वगळल्याचं राज्याच्या महिला बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या.

- **- होल्ड - आदिती तटकरे - -**

ज्या अर्जदारांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केली आहे, ज्या लाभार्थ्यांच्या नावावर वाहन नोंदणी नाही आणि तरीही योजनेचा लाभ स्थगित झाला आहे, किंवा ज्या लाभार्थ्यांचा "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेसह इतरही योजनांचा लाभ स्थगित झाला आहे,

त्यांनी तातडीने याबाबत महिला व बालविकास विभागाकडे संपर्क साधावा. या सर्व प्रकरणांची विभागाकडून पुन्हा पडताळणी करण्यात येईल, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात बऱ्याच ठिकाणी, मराठवाड्यात काही ठिकाणी तर विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त तापमान वाशिम इथं ४३ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**